बाजार हस्तक्षेप योजनेअंतर्गत किमान आधारभूत किंमतीने राज्यशासना-मार्फत खरेदी करण्यात आलेल्या तुरीचे चुकारे अदा करण्याकरिता कर्ज उभारण्यासाठी मंजूर केलेल्या शासन हमीला कार्योत्तर मंजूरी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग

शासन निर्णय, क्रमांक: सपस-२०१७/प्र.क्र. ७७(भाग-३)/२४ स

मंत्रालय, विस्तार, मुंबई-३२

दिनांक:- २३ ऑक्टोबर, २०१७

संदर्भ:- १) शासन निर्णय, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग
क्रमांक: सपस-२०१७/प्र.क्र. ७७ /२४ स,दिनांक २७/४/२०१७
२) शासन निर्णय, वित्त विभाग
क्रमांक: शाहमी-२०१७/सपववि/प्र.क्र. ४२ /अर्थबळ,दिनांक २८/४/२०१७
३) शासन निर्णय, वित्त विभाग
क्रमांक: शाहमी-२०१७/सपववि/प्र.क्र. ४२ /अर्थबळ,दिनांक १२/६/२०१७

प्रस्तावना:-

राज्यात हंगाम २०१६-१७ मध्ये मान्सूनचा समाधानकारक पाऊस व अनुकूल हवामान यामुळे झालेल्या तूरीच्या मुबलक उत्पादनाच्या पार्श्वभूमीवर केंद्रशासनाच्या किंमत स्थिरता निधी योजनेंतर्गत ४०लाख क्विंटल तूरीची खरेदी केल्यानंतरही दिनांक २२/०४/२०१७ पर्यंत खरेदी केंद्रावर आवक होऊन, नोंद झालेली तूर जवळपास १० लाख क्विंटल तूर खरेदीविना शिल्लक होती. अशी जवळपास १० लाख क्विंटल शिल्लक तूरीची खरेदी करण्यासाठी शासन निर्णय, दिनांक २७/०४/२०१७ अन्वये राज्य शासनामार्फत बाजार हस्तक्षेप योजना राबविण्यात आलेली होती. सदर योजना महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या, मुंबई व दि विदर्भ सहकारी पणन महासंघ मर्या, नागपूर या नोडल एजन्सीमार्फत करण्यात आलेली आहे. या योजनेतर्गंत खरेदी केलेल्या तूरीचे चुकारे अदा करण्यासाठी आणि अनुषंगिक खर्चासाठी नोडल एजन्सीना वित्त विभागाच्या दिनांक २८/४/२०१७ च्या शासन निर्णयान्वये रु. ४३५ कोटी (पणन महासंघ) व रु.१३५ कोटी (विदर्भ पणन महासंघ) अशी एकूण रु. ५७०.०० कोटीची हमी मंजूर करण्यात आली होती. सदर शासन हमीसाठी वित्त विभागाने स्पष्ट केल्याप्रमाणे मंत्रिमंडळाची कार्योत्तर मंजूरी घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीतील परिच्छेद २ मधील अनु. क्र.१४ नुसार राज्यातील महसुलाच्या प्रतिभूतींवर कर्ज उभारताना मा.मंत्रीमंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे. यासाठी बाजार हस्तक्षेप योजनेअंतर्गत किमान आधारभूत किंमतीने राज्यशासनामार्फत खरेदी करण्यात आलेल्या तुरीचे चुकारे अदा करण्याकरिता पणन महासंघाला कर्ज उभारण्यासाठी मंजूर केलेल्या शासन हमीला पुढील अटींच्या अधीन राहून कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे:-

I. वित्त विभागाने कर्ज उभारण्यास दिलेली शासन हमी दिनांक १२.६.२०१७ पासून ६ महिन्यांसाठी लागू राहील.

II. महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या. मुंबई यांचेकडून कर्ज फेडीत कसूर झाल्यास फेडरेशनच्या चल/अचल मालमत्तेची विक्री/लिलाव (Auction) करुन कर्जवसुलीची प्रक्रीया पुर्ण करावी. तसेच कर्जवसुलीसाठी सर्वतोपरी प्रयत्न केल्याशिवाय राष्ट्रीयकृत बँकेला हमीपुर्ततेकरीता शासनहमीची प्रतिभुतीचा वापर करता येणार नाही, ही अट वित्त विभागाच्या शासन निर्णय, दिनांक २८/०४/२०१७ मधून वगळण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०२३१३३३२१७८०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Valvi Kalu Gonya

Digitally signed by Valvi Kalu Gonya
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Op,Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=714701fc3db9c38a46f4cd82e1e450b51a9e92eede8c323934f82edb538d3b20, cn=Valvi Kalu Gonya
Date: 2017.10.23 13:22:59 +05'30'

(का.गो. वळवी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री (सहकार, पणन व वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
४) मा. राज्यमंत्री (पणन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
५) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
६) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
७) पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
८) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या. मुंबई
९) व्यवस्थापकीय संचालक, दि विदर्भ सहकारी पणन महासंघ मर्या. नागपूर
१० महालेखापाल, महाराष्ट्र-१ /२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा), मुंबई/नागपूर,
११) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१२) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे,
१३) वित्त विभाग, व्यय-२/अर्थसंकल्प-११, मंत्रालय, मुंबई-३२
१४) कार्यासन अधिकारी, १७ स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५) निवड नस्ती २४ स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई